# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था(मिपा),औरंगाबाद

# School Leadership Academy,Aurangabad (Maharashtra)

**मोड्यूल क्र.३७**

## गरजाधिष्ठित शाळा जोड प्रकल्प

## Need Based School Pairing

## महाराष्ट्र राज्याच्या दुर्गम व आदिवासी क्षेत्रातील गरजाधिष्ठित शाळांच्या जोडणीत शालेय नेतृत्वाची भूमिका

## Role of School Leadership in Need Based School Pairing in Remote and Tribal Areas of Maharashtra

**प्रस्तावना :** महाराष्ट्र राज्यातील नवनिर्मित पालघर जिल्हा सागरी, नागरी व आदिवासी क्षेत्राने व्याप्त असून बहुतांश क्षेत्र वनव्याप्त आहे. प्राकृतिक रचना उंच सखल भूप्रदेशाची असल्याने लोकसंख्या व मानवी वस्तीस्थान रचना विखुरलेली आहे. जिल्ह्याचे मुख्यालय पालघर शहर असून जिल्हा एकूण आठ(८) गट/तालुका/खंडात विभागला आहे. समुचित अधिसूचना व शासन आदेशाने जिल्ह्यातील बहुतांश क्षेत्र पेसा(PESA) अधिनियमांतर्गत येत असून आदिवासी लोकजीवनाचे उन्नयन होणेस्तव शासन व प्रशासन, आरोग्य, शिक्षण या माध्यमांसह अनुषंगिक सर्व विभागांच्या सहाय्याने आदिवासी लोकजीवनात प्रगतीची नवी पहाट आणण्यासाठी कटीबद्ध व प्रयत्नशील आहे.

जिल्ह्यातील अतिपूर्वेस असलेला तालुका म्हणजे मोखाडा तालुका. मा.गट विकास अधिकारी, मा.गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अनुक्रमे तालुक्याची व शिक्षण विभागाची धुरा अतिशय सक्षमपणे पुढे जात असून तालुका प्रगती पथावर आहे. मोखाडा तालुक्यातील शैक्षणिक बीट वाशाळा

अंतर्गत समूह साधन केंद्र-खोच हे एकूण १७ शाळांच्या समूहाचे केंद्र असून १३ जि.प.व्यवस्थापन, २ शासकीय, १ खाजगी अनुदानित व १ स्वयं अर्थसहाय्यीत शाळा संचलित आहेत.

**गरजाधिष्ठित शाळाजोड प्रकल्प - संकल्पना :** तालुक्यातील लोकसंख्येचे वितरण पाहता मानवी वस्तीस्थाने मर्यादित लोकसंख्येसह विखुरलेली असल्याने, शासन धोरणानुसार लोकसंख्या या निकषावर आरोग्य,शिक्षण, कृषी आदी सुविधा अवलंबित आहेत. खोच केंद्रातील बहुतांश प्राथमिक शाळा या द्विशिक्षकी आहेत. यातच हा प्रदेश सह्याद्रीच्या पश्चिम उतारावरील आरोह पर्जन्याचा प्रदेश असल्याने तीव्र उताराचे डोंगर, नदीप्रवाह येथील लोकजीवनावर परिणाम करतात. दळणवळण, संपर्क यंत्रणा, आंतरजाल, विद्युतीकरण, भौतिक सुविधा यांचा असलेला कमालीचा अभाव शैक्षणिक प्रगतीत अडसर असल्याचे दिसून येते. यातही शासन,प्रशासन, अशासकीय व सामाजिक संस्था येथील बालकांसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य, शाळांना भौतिक सुविधा, उपक्रम आधारित मनुष्यबळ उपलब्धी आदी विविध मार्गानी शैक्षणिक सहाय्य करीत असून, गुणवत्तेत भर टाकत आहेत. परंतु, बहुतांश शाळांमध्ये पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध आहेत. पण; परिपूर्ण नाही काही शाळांत विद्युत सुविधा उपलब्ध आहे. तर कुठे नाही कुठे कलामंच उपलब्ध आहे तर कुठे नाही, कुठे डिजिटल वर्गखोली सुस्थितीत आहे तर कुठे नाही अशी विसंगती विविध शाळांत आढळून येतात.

समूह साधन केंद्राच्या वतीने विविध शाळांमध्ये शैक्षणिक सनियंत्रण हेतूने भेटी देत असताना विसंगत बाबी प्रकर्षाने जाणवल्या. अगदी नजीकच्या क्षेत्रात शाळा उपलब्ध असूनही उपलब्ध सुविधामध्ये बरीच तफावत आढळली. अल्प पटसंख्येच्या शाळा असल्याने शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मर्यादित अनुदानात परिपूर्ण सुविधा प्राधान्याने उपलब्ध करण्यात अडचणी येतात. लोक सहभाग घेताना मर्यादित लोकसंख्या व त्यांचा आर्थिक स्तर हा दारिद्र्य रेषेखालील आढळतो. परंतुक, असे की, एकजिनसी व एकाच व्यवस्थापनाच्या शाळा या एकमेकांना पूरक ठरणाऱ्या असल्याने बहुतांश शैक्षणिक, प्रशासकीय, आर्थिक आदी बाबीमध्ये समानता असते. शाळामधील हे साम्य ओळखून मनुष्यबळाप्रमाणेच शालेय व सहशालेय बाबींच्या आदान-प्रदानातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत भर पडणे शक्य असल्याने शाळांची जोड घालणे उपयुक्त ठरणार आहे. प्राधान्याने नजीकच्या अंतरावरील, सोयी सुविधा तुलनेने अधिक असलेली, मनुष्यबळाची देवाण-घेवाण शक्य असलेली शाळा ही दुसऱ्या शाळेशी जोडली गेल्यास मर्यादित सुविधा असलेली शाळा अधिकची प्रगती करण्यास प्रवृत्त होईल व प्रकल्पाचे सातत्यपूर्ण सनियंत्रण सकारात्मक प्रगती करू शकेल असा विचार करून प्रत्यक्षात शाळाजोड प्रकल्पाची अंमलबजावणी झाली.

**गरजाधिष्ठीत शाळाजोड प्रकल्पाची ध्येये :**




गरजाधिष्ठित शाळा जोड प्रकल्प हा एकमेकांच्या सहकार्याने यशस्वी होऊ शकणार असल्याने दोन्ही शाळांची समतुल्य रचना व स्थिती असणार आहे. तसेच प्रत्येक शाळा ही एकमेकांस गुणवत्ता संवर्धनासाठी परस्पर पूरक ठरणार आहे, या हेतूने खालील टप्प्यानुरूप काम करण्याचे निश्चित केले.

१) शाळांमध्ये उपलब्ध सुविधानुसार वर्गीकरण करणे.

२) विविध शालेय घटकांत असलेली तफावत निश्चित करणे

३) शाळांची गरजा निश्चिती अंती पूरक शाळा निश्चित करणे

४) शाळाच्या आदान-प्रदान बाबीची यादी निश्चित करणे.

५) शाळांची समस्या सोडवणूक व मार्गदर्शक भूमिका हेतूने जोडणी करणे.

६) शाळा जोड प्रकल्पातील शाळांच्या आदान-प्रदानाची यशस्विता निश्चित करणे.

**शाळाजोड प्रकल्प अंमलबजावणी :**

शालेय पर्यवेक्षण करताना शालेय घटकातील विविध पैलुना उलगडणे व त्याचा सहसंबंध विद्यार्थी विकासात कितपत सहाय्यभूत ठरत आहे याचे प्रभावी मुल्यांकन, अंदाज बांधणी, सापेक्षता बांधणी शैक्षणिक सनियंत्रण कामी किती आवश्यक ठरू शकेल ? याचा वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक होते. याबाबत पायाभूत सुविधा, विद्यार्थी सवलती, वर्ग रचना, आवश्यक तंत्रसाधने, यांची पाहणी केली असता, असे लक्षात आले की, या विविध घटकांमध्ये समन्वय साधून सर्व साधनांच्या समन्वित प्रयत्नांतून विद्यार्थी विकासाचे गुणवत्तापूर्ण चित्र आवश्यक ठरू शकेल यासाठी, प्रकल्प रचना व अंमलबजावणी खालीलप्रमाणे केली.

१) शाळांमध्ये उपलब्ध सुविधानुसार शाळांचे वर्गीकरण केले. हे वर्गीकरण करत असताना त्यांच्यातील अंतर, शाळा सिद्धी गुणांकन, शाळा सिद्धी विकासात्मक नियोजन, गरजाची मांडणी, आदी विविध बाबी विचारात घेऊन रचना केली. वर्गीकरण केले.

२) विविध शालेय घटकांत असलेली तफावत निश्चित करणे आवश्यक असल्याने, प्रत्येक शाळेची शक्तिस्थाने व त्रुटी यांचा आढावा घेतला. मांडणी केली आणि गुणवत्ता विकासाची संधी ओळखून, त्यांची जोडणी योग्य शाळेचा विचार केला.

३) शाळांची गरजा निश्चिती करून पूरक शाळा निश्चित केल्या. ज्यायोगे,प्रत्येक शाळेस काही सुविधा देणे तर काही सुविधा घेण्याच्या संधीस वाव राहील आणि परस्पर शाळांमध्ये परस्पर सामंजस्यातून एक चांगली कार्य संस्कृती निर्माण होऊ शकेल याचा प्रयत्न केला.

४) शाळाच्या आदान-प्रदान बाबीची यादी निश्चित केली. ज्यामध्ये, भौतिक सुविधा, शालेय साहित्य, तंत्र साधने, आदर्श तासिका, मार्गदर्शन सत्रे, माहिती सहाय्य आदी बाबींची गरजेनुसार निश्चिती केली.

५) शाळांची समस्या सोडवणूक व मार्गदर्शक भूमिका हेतूने जोडणी केली.



तंत्रज्ञानाच्या वापरातून केंद्रातील शाळांना लाभ देण्याचा प्रयन्त



**केंद्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा उपक्रम कार्यक्रमात एकत्रित आणून कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी केली जाते.**

**आदान-प्रदान क्षेत्रे :**

अ) **मनुष्यबळ :** प्रत्येक क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची अत्यंत गरज असल्याने प्रत्येक दिवशी नवनवीन बाबी शिकण्याने मनुष्यबळाची क्षमता बांधणी (Capacity Building) होऊन कुशलता(Skill) येण्यास मदत होते. डिजिटल साधन, विविध शैक्षणिक संपुट (App.) वेब संकेतस्थळे हाताळणी आदी बाबी एकमेकांच्या सहायाने हाताळता येतील. विविध स्पर्धा परीक्षा, मैदानी खेळ आदी मध्ये शाळा एकमेकांस पूरक होत आहेत.

ब) **शालेय सुविधा :** विद्युत सुविधा, डिजिटल वर्गखोली, मैदान, ग्रंथालय, वाचन कोपरा आदीच्या आदान-प्रदानातून कामकाजात सुसूत्रता येत आहे.

क) **सहशालेय उपक्रम :** स्नेहसंमेलन तयारी,स्थानिक सण-समारंभ, निबंध, गीतगायन, नृत्य, वस्तुनिर्मिती, स्थनिक कारागिरी, प्रात्यक्षिक कार्य, उत्पादक कार्य आदी बाबी एकमेकांच्या सहाय्याने पूर्ण होत आहेत.

**ख) डिजिटल साधने :** उपलब्ध संगणक सुविधा, ई-साधने, साधनांची प्रत्यक्ष हाताळणी व वापर एकमेकांच्या ज्ञानात भर टाकणारी कृती होऊन माहिती व कौशल्याचे आदान-प्रदान होऊन शालेय व्यवस्थापनात सुगमता येत आहे.

**ग) माहिती :** शैक्षणिक, आर्थिक व प्रशासकीय पूर्तता करताना प्रत्येक बाब नव्याने समजून घेऊन माहितीबाबत खात्री करणे आवश्यक ठरते. यात बहुधा अल्प माहितीच्या आधारे कार्यवाही मुळे पुन्हा-पुन्हा त्या संदर्भाने पत्रव्यवहार, पूर्तता, आदान-प्रदान होत असते. परंतु, दोन्ही शाळामधील माहितीच्या खात्रीतून कार्यवाही पूर्तता केल्यास याबाबत अधिक स्पष्टता येऊन अचूक पूर्णत्वास जात आहे.

घ) **पायाभूत सुविधा :** सुसज्ज वर्गखोली, नाविन्यपूर्ण पाठ, स्वच्छतागृहे, पाणी सुविधा, डिजिटल साधने, खेळ साहित्य, मैदाने, आदी बाबीच्या आदान-प्रदानातून शालेय गुणवत्तेत मोलाची भर पडत आहे.

**शाळाजोड प्रकल्पांतर्गत खोच केंद्रातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या १२ शाळांच्या आदान प्रदाना संदर्भात खालील निकष ठरविण्यात आले.**

**निकष :** अ) नजीकच्या अंतरावरील शाळा
ब) तुलनेने चांगल्या सोयी सुविधा असलेली शाळा
क) वाहतूक व संपर्कात अडसर न ठरणारी शाळा
ड) मनुष्यबळाचा विसंगत वयोगट असणारी शाळा
इ) शाळा सिद्धी गुणांकनात उच्च श्रेणी असणारी शाळा

**यशाचे सूत्र : (शत्रूसंधो)**

| शक्तिस्थाने | त्रुटी | संधी | धोके |
|---|---|---|---|
| | | | |

आपली शक्तिस्थाने, असणाऱ्या त्रुटी, असलेल्या संधी व संभाव्य धोके पाहता दोन्ही शाळांनी सुगमपणे शालेय व्यवस्थापन व संचलन सुयोग्य होईल यास्तव परस्पर पूरक, ज्ञान, कौशल्य व गुणवर्धक बाबीचे आदान-प्रदान करून शाळा सक्षम करण्यासाठी खालील प्रमाणे गरजेनुसार नियोजन करून अंमलबजावणी करण्यात आली.

## शाळाजोड प्रकल्पांतर्गत शाळा यादी : नमुना मासिक नियोजन

| क्र. | शाळा जोडी | | आदान-प्रदान बाबी | |
|---|---|---|---|---|
| 1. | **शाळा १** | **शाळा २** | **शाळा १ ते शाळा २** | **शाळा २ ते शाळा १** |
| 2. | खोच | पिंपळपाडा | • ग्रंथालय उपलब्धी<br>• कलामंच उपलब्धी | • संगणक हाताळणी<br>• अभिलेख मांडणी सहाय्य |
| 3. | कळम वाडी | खडकाची मेट | • □साधनांचा वापर<br>• मैदानी स्पर्धा सहभाग | • समारंभ आयोजन<br>• मुलींचे शिक्षण |
| 4. | भेंडीचा पाडा | नवीवाडी | • वाचन-लेखन कार्यवाही<br>• माहिती सादरीकरण | • सहशालेय उपक्रम कार्यवाही<br>• निबंध व भाषण स्पर्धा,लोकसहभाग |
| 5. | पळसुंडे | विकासवाडी | • तंत्रज्ञान सहाय्य<br>• स्पर्धा परीक्षा तासिका | • अभिलेख पूर्तता मार्गदर्शन<br>• लोकसहभाग समन्वय |
| 6. | धोंड.मेट | शिरसोन पाडा | • शालेय अभिलेख मांडणी व पूर्तता<br>• सहयोगी अध्ययन सहाय्य (उच्च प्राथ – निम्न प्राथ.) | • मनुष्यबळ उपलब्धी<br>• बालरक्षक कार्यवाही- सहाय्य |
| 7. | पुलाची वाडी | शेंड्याची मेट | • शालेय परसबाग दिग्दर्शन<br>• अभिलेख लेखन सहाय्य | • माहिती आदान-प्रदान सहाय्य<br>• विद्यार्थी क्रीडा कौशल्ये सराव |




मॉडेल तासिका निमित्ताने शाळांची देवाण घेवाण...


जिल्हा परिषद शाळा, विकासवाडी व शाळा पळ सुंडे येथील शिक्षक व विद्यार्थी



जिल्हा परिषद शाळा पिंपळपाडा या एक शिक्षकी शाळेत कार्यरत एकच पुरुष शिक्षक श्री.माणिक वलटे सर यांनी त्यांच्या शाळेत प्रवेशित मुलींच्या शैक्षणिक व अन्य किशोरवयीन समस्यांचे निराकरण होणेकामी ...

जिल्हा परिषद केंद्र शाळा खोच येथील महिला शिक्षिका श्रीमती. शुभांगी आंबीलकर यांच्या सहाय्याने विद्यार्थिनींना उद्बोधनपर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करून लाभ दिला.





जिल्हा परिषद केंद्र शाळा येथे कार्यान्वित विज्ञान प्रयोगशाळा चा लाभ , जिल्हा परिषद शाळा, पिंपळ पाडा येथील विद्यार्थ्यांना सोपे प्रयोग, साहित्य हाताळणी व अन्य वैज्ञानिक संकल्पना पूर्तीसाठी करून दिला



वरील फोटो प्रमाणे, जिल्हा परिषद केंद्र शाळा येथील ग्रंथालयाचा लाभ जोड प्रकल्पातील शाळेस करून देताना जिल्हा परिषद केंद्र शाळा खोच येथील शिक्षक व  जिल्हा परिषद शाळा पिंपळपाडा येथील शिक्षक...

https://drive.google.com/file/d/10RQzNezrm9AZWEHUEHsjij8IeYuhIMyv/view?usp=drivesdk

६) शाळा जोड प्रकल्पातील शाळांच्या आदान-प्रदानाची यशस्विता निश्चित केली आणि त्यापैकी काही निवडक यशस्विता खालीलप्रमाणे मांडता येतील व यामध्ये प्रत्येक दिवशी वाढ होताना दिसत आहे. शाळाजोड प्रकल्प राबवीत असतांना निश्चितपणे पर्यवेक्षण प्रक्रियेच्या सर्व समावेशक व गुणवत्ता पातळीवरून विचार होणे गरजेचे वाटले त्यातूनच शाळाजोड प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली.

**यशस्विता:**












**जि प शिरसोनपाडा शाळेस परसबाग निर्मिती स्पर्धेमध्ये मोखाडा तालुका स्तरावर दुसरा क्रमांक प्राप्त झाला. तसेच, या शाळेने निर्माण केलेल्या परसबागेचे इतर शाळेतील शिक्षकांनी प्रत्यक्ष भे□दिऊन व मार्गदर्शन घेऊन इतर ६ शाळांनी परसबाग फुलवली.**

**निवडक यशस्विता : [https://online.fliphtml5.com/jwxaj/nbes/](https://online.fliphtml5.com/jwxaj/nbes/)**

**चिंतनात्मक प्रश्न -**

1.शाळा सक्षम होण्यासाठी शाळा जोड प्रकल्प उपयुक्त आहेत का? आपला वस्तुनिष्ठ अभिप्राय किमान 5/6 मुद्द्यानुरूप स्पष्ट करा

2.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये शिफारस केलेली शाळा संकुल संकल्पना शाळा जोड प्रकल्पातून पूर्णत्वास जाते किंवा नाही आपले मत थोडक्यात लिहा.

**शाळाजोड प्रकल्पाची यशस्विता...**

शाळा जोड प्रकल्प केंद्रात सद्यस्थितीत सुरू आहे. परसबाग निर्मिती ही या प्रकल्पाची यशस्विता आहे.प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना या केंद्र शासनाच्या School Education and Literacy Dept (SELD )मार्फत दिलेल्या एस सूचनानुसार शाळेत किचन गार्डन तयार व्हावे, ज्याचा उपयोग मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या आहारातून होऊन संतुलित आहार प्रत्येक बालकास मिळावा. यातून सांघिक वृत्ती ,नियोजनबद्ध कृती, सहकार्य वृत्ती ,श्रम प्रतिष्ठा निसर्ग हाच गुरु अशा अनेक बाबी मुलांना समजल्या.या शाळेने निर्माण केलेल्या परसबागेचे इतर शाळेतील शिक्षकांनी प्रत्यक्ष भेट देऊन अनेक बाबी समजून घेतल्या . त्यातून केंद्रातील इतर सहा शाळांनी प्रेरणा घेऊन सहा शाळांनी परसबाग फुलवली. उर्वरित पन्नास टक्के शाळा डोंगर उतारावर आहेत, काही डोंगराळ भागात आहेत, माती सुपीक नाही परंतु तेथेही परसबागेची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे

परसबाग निर्मिती स्पर्धेत जिल्हा परिषद शिरसोनपाडा शाळेस तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला ,ही परसबाग पहाण्यासाठी खालील लिंकचा वापर करा.

**निवडक यशस्विता :** https://online.fliphtml5.com/jwxaj/nbes/

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या दृष्टीकोनातून मोड्यूलची उपयुक्तता -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये घटक क्रमांक सात शाळा संकुलांच्या माध्यमातून कार्यक्षम संसाधन आणि प्रभावी व्यवस्थापन या घटकात नमूद केल्यानुसार सर्व शिक्षा अभियानामुळे व राज्यात झालेल्या अनेक प्रयत्नांमुळे प्रत्येक वस्तीमध्ये प्राथमिक शाळांची स्थापना झाली मात्र त्यामुळे अनेक छोट्या शाळांची निर्मिती झाली,यु डायस 2016 -17 च्या डेटानुसार भारतातील

जवळजवळ 28% सार्वजनिक प्राथमिक शाळांमध्ये 14.8% उच्च प्राथमिक शाळांमध्ये 30 पेक्षा कमी विद्यार्थी आहेत. कमी विद्यार्थी संख्येमुळे कमी शिक्षक व कमी. साधनांची उपलब्धता . अशा शाळांमध्ये आहे.तसेच संगीत,कला आणि क्रीडा यासारखी मुख्य क्षेत्रे शिकविण्यात अडचणी आहेत,विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य, ग्रंथालय, डिजिटल साहित्य यांच्या उपलब्धतेतही कमतरता आहेत. अशाच कमतरता मोखाडा तालुक्यातील खोच केंद्रात काम करताना दिसून आल्या. त्यामुळे शाळाजोड प्रकल्पाचे नियोजन करून अंमलबजावणी करण्यात आली. शालेय घटकांच्या व शाळा समूहातील प्रत्येक घटकाच्या समन्वयातून गुणवत्तापूर्ण वाटचालीसाठी शाळा समूहातील शाळांची जोडणी गुणात्मक विकासासाठी सहाय्यभूत ठरत आहे. याकामी, कौशल्यपपूर्वक व गरजाधीश्ठीत शाळा जोडणी समूहातील शाळांच्या गुणवत्तापूर्ण वाटचालीत मैलाचा दगड ठरू शकेल.

**शालेय नेतृत्वासाठी मोड्यूलची उपयुक्तता -**

१.सदर मोड्यूलच्या अध्ययनानंतर शालेय नेतृत्वाला शाळा जोड प्रकल्पाचे महत्त्व विद्यार्थी अध्ययनात अत्यंत उपयुक्त आहे हे समजेल.

२.आदान प्रदान प्रक्रियेतून शाळा सहयोग व सहकार्य प्रक्रिया उत्तम होऊ शकते यावरही प्रकाश पडेल.

३.शत्रुसंधो या संकल्पनेचा वापर करून आदान प्रदान करण्यासाठी शाळांचे गट कसे करता येतील याबाबत माहिती मिळेल.

४.दिव्यांग मुलांना मिळणारे सहाय्य क्रीडा कला हस्तकला संगीत या विषयांचे ज्ञान मिळविण्यासाठी सहयोगी शाळेची मदत घेता येईल.

५.आदान प्रदान क्षेत्रातील मनुष्यबळ शालेय सुविधा डिजिटल साधने माहिती पायाभूत सुविधा या घटकांसंदर्भात सहकार्य घेण्याबाबत माहिती व मार्ग प्राप्त होतील.

६.NEP 20 20 मध्ये नमूद केल्याप्रमाणे शाळा संकुलांच्या माध्यमातून कार्यक्षम संसाधन आणि प्रभावी व्यवस्थापन या शिफारसींची अंमलबजावणी सोपी करण्यासाठी या मॉड्युलचा निश्चितपणे उपयोग होईल .

७.शाळेला येणाऱ्या भौतिक काही प्रमाणात प्रशासकीय अडचणी सोडविण्यास या मोड्युलची मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


१. केंद्रप्रमुख ,पदनिर्मिती,कर्तव्येजबाबदाऱ्या संदर्भातील शासन निर्णय

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शाळा संकुल घटक

३. निष्ठा ,मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार,डिसेंबर २०१९,संचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे

४. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय २०१५-१६

५. अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र ,करंदीकर सुरेश,फडके प्रकाशन,कोल्हापूर २००९,

६. http://ncsl.niepa.ac.in/

७. https://maa.ac.in/ वरील जीवन शिक्षण अंतर्गत लेख



**मोड्यूल विकसक**
श्री.शिवाजी रेणापूरे
केंद्रप्रमुख
समूह साधन केंद्र खोच
बीट वाशाळा,
ता.मोखाडा,जि.पालघर

**समन्वयन**
डॉज्योती कुलकर्णी.
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),
औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्रीरमाकांत काठमोरे.
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),
औरंगाबाद